
अल्पवयीन मुलीचा विनयभंग : आरोपी अटक >>पान 2
उपसभापतीचा पुढाकार: विद्यार्थ्यांना मिळाला प्रवेश >>पान 3
लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे प्रवाशी निवाऱ्याची दुरावस्था >>पान 4

**सुविचार**
अपमानाच्या पायऱ्यावरुनच ध्येयाचा डोंगर चढायचा असतो.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034


राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपचे निदर्शने
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 38 ■ शनिवार, दि. 14 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# उच्च सुशिक्षीत नेतृत्व : डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाणला यांना जनतेतून पसंती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी** : आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत वैद्यकीय क्षेत्रातील एक उच्चशिक्षीत, गोरगरिबांच्या संकटकाळी धावून येणाऱ्या, सामाजिक कार्याची,शेतकरी समस्यांची जाण असणाऱ्या नेतृत्व म्हणून डॉ. सौ ऋतुजा ताई यांची ओळख होत आहे. सामाजिक, वारसा लाभलेला असल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत डॉ. ऋतुजा ताई यांच्या रुपाने मतदारांसमोर एक नवा पर्याय निर्माण झाला असून मतदारांकडून डॉ.ऋतुजा ताई चव्हाण (गवई) यांच्या नावाला प्रथम पसंती मिळत आहे. डॉ.सौ.ऋतुजा ताई ह्या मुळच्या मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील असून राजमाता जिजाऊ सामाजिक फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील M.B.B.S. चे शिक्षण शासकीय महाविद्यालय यवतमाळ येथुन पूर्ण केलेले आहे. सध्या त्या वैद्यकीय सेवा देत आहेत. तसेच त्यांचे वडील श्री संजय संतोषराव गवई हे मदन वामन पातुरकर विद्यालय, डोणगाव येथे प्राध्यापक आहेत . एक उच्चशिक्षीत व सामाजिक कार्यकर्ते म्हणून श्री संजय गवई सर यांची ओळख आहे. डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांचे पती श्री ऋषांक ओंकारराव चव्हाण हे सुद्धा सामाजिक कार्यातील मोठे नेतृत्व आहे. डोणगांव अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, डोणगांवचे ते अध्यक्ष असून त्यांनी विविध माध्यमातून हजारो गोरगरिब, शेतकरी कुटुंबाची मदत केलेली आहे. स्थानिक एकमेव महिला उमेदवार म्हणून मतदारांकडून विधानसभा निवडणुकीत एक सक्षम पर्याय म्हणून ऋतुजा ताईंकडे पाहिले जात आहे. ओबीसी कुटूंबामधून असणारा मागासवर्गीय उमेदवार आणि विद्यमान आमदारांच्या जातीय समिकरणामध्ये तुल्यबळ असलेला एकमेव उमेदवार, मतदारसंघातील नागरिकांमध्ये असलेला दांडगा जनसंपर्क, स्वच्छ प्रतिमा, महिला सबलीकरणात भरीव कामगीरी, शेतकरी प्रश्नांवर विविध मोर्चे, आंदोलन व बैठकांमध्ये सक्रीय सहभाग, गोर-गरीबांच्या मोफत रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर




मतदार संघातील प्रत्येक शहर, ग्रामीण भाग व गांव- वस्त्यांवर वैयक्तीक संपर्क वेळप्रसंगी गोरगरिबांना आर्थिक मदत करणारे म्हणून त्यांची ओळख आहे. मतदार संघातील एकमेव सुशिक्षीत महिला उमेदवार, परिसरातील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आत्मनिर्भर करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या डॉ.सौ.ऋतुजाताई यांना मतदार संघातील हजारो महिलांची पसंती आहे. तसेच विविध धार्मिक सण, उत्सव, मोहरम, जयंती, पुण्यतिथी प्रसंगी भरीव आर्थिक योगदान देणारे नाव म्हणूनही त्यांची मतदार संघात ओळख आहे. वडिलांचा मागासवर्गीयांमध्ये दांडगा जनसंपर्क व नातेवाईकांचा मतदार संघामध्ये मोठा गोतावळा. पतीचे सहकार क्षेत्रात असलेले भरीव योगदान व मतदार संघातील प्रभाव. पतीचे सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य व मतदार संघात दांडगा जनसंपर्क व मोठा मित्र परिवार.अनेक गरीब व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेतलेले आहे.

परिसरातील खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी सामन्यांचे आयोजन, खेळाडुंना किट वाटप व बक्षीस वितरण केलेले आहे. शेतकर्यांच्या विविध प्रश्नांवर भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन,परिसरातील अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप,पतीने सहकार क्षेत्राच्या माध्यमातुन मतदार संघातील अनेक गरीब व होतकरु तरुणांना उपलब्ध करून दिलेला रोजगार अशा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक,वैद्यकीय,महिलासाठी व्यवसाय उभा करण्यासाठी घेतलेला पुढाकार अशा अनेक क्षेत्रांतील भरीव योगदानामुळे व सर्व समाजातील एक आपलेसे नेतृत्व म्हणून डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक (गवई) यांच्याकडे पाहिले जात असून आगामी विधानसभा निवडणुकीत एक उच्चशिक्षीत एकमेव महिला उमेदवार म्हणून त्यांचे नाव आघाडीवर आहे. तर मतदारांकडून सुद्धा त्यांना प्रथम पसंती मिळत असून विकासाचे व्हिजन असणारे नेतृत्व म्हणून डॉ.सौ.ऋतुजाताई ऋषांक चव्हाण यांच्याकडे मतदारांकडून पाहिले जात आहे.

मतदार

# एसटी महामंडळ ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर

## ऑगस्टमध्ये ३१ पैकी २० विभाग नफ्यात; १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये नफा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करणारी एसटी ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर धावू लागली आहे. आर्थिक संकटामध्ये रूतलेल्या एसटीने आता भरारी घेतली असून महामंडळाची आर्थिक घोडदौड सुरू झाली आहे. ऑगस्ट महिन्यात ३१ विभागांपैकी २० विभागांनी नफा कमवला आहे. या महिन्यात एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये इतका नफा झालेला आहे. तब्बल ९ वर्षांनी एसटी महामंडळ नफ्यात आल्याने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करीत भविष्यातही




प्रयत्नांची पराकाष्टा करून महामंडळ सातत्याने नफ्यात येईल, असे प्रयत्न करण्याचे आवाहनही केले आहे.

मागील काळात दोन वर्ष कोरोना महामारी आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एस टी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. मे २०२२ पासून एसटीची सुरळीत वाहतूक सेवा सुरू झाली. तथापि, एसटीचा घटलेला प्रवासी पुन्हा एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास व सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात ५० टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या, की ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. सध्या सरासरी ५४ लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत.

याबरोबरच एसटी प्रशासनाने गेल्या वर्षभरात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान', विद्यार्थ्यांना शाळेत थेट पास, प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन, श्रावणात एसटी संगे तीर्थाटन, असे अनेक अभिनव उपक्रम राबविले. तसेच जे विभाग गेली कित्येक वर्ष तोट्यामध्ये आहेत, त्या विभागांना मार्गदर्शन करण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडून पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली. स्थानिक पातळीवर आगारनिहाय कर्मचारी व अधिकारी यांच्या बैठका घेण्यात आल्या. तोट्याच्या मार्गावरील बस फेऱ्या बंद करून, त्या ज्या मार्गावर प्रवासी जास्त आहेत तेथे वळविण्यात आल्या. याच बरोबर नादुरुस्ती बसेसचे प्रमाण १२ टक्क्यांवरुन ६ टक्के झाले. मागील वर्षाच्या तुलनेमध्ये ते निम्याने कमी करण्यात आले. तसेच चालक व यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे सातत्याने प्रबोधन करुन डिझेलची खपत ०.५२ कि.मी. ने वाढविण्यात आले. त्यामुळे डिझेलची बचत झाली आहे. या सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिपाक म्हणून ऑगस्ट महिन्यामध्ये एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार इतका नफा प्राप्त झालेला आहे.

भविष्यात येऊ घातलेल्या स्वमालकीच्या बसेस व भाडेतत्वावरील बसेस एसटीच्या ताफ्यात सामील झाल्यानंतर त्याचा योग्य विनियोग करुन एसटी महामंडळ सातत्याने फायद्यात राहील यासाठी कृतीशील आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी केली जाईल. जेणेकरुन एसटीला गतवैभव प्राप्त होईल, असा विश्र्वास एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. कुसेकर यांनी व्यक्त केला आहे.

# २१ सप्टेंबर रोजी जुहू बीच येथे स्वच्छता मोहीम

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही २१ सप्टेंबर रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू बीच, मुंबई येथे राज्य सरकार, स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सांगितले.

दलामल हाऊस, नरीमन पॉँईंट येथे आयोजित आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस निमित्ताने समुद्रकिनारा स्वच्छता मोहीमेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते.

श्री. दराडे म्हणाले की, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली तसेच राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत सर्व १३ किनारी राज्यांमध्ये २१ सप्टेंबर, २०२४ रोजी (आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस) समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू बीच, मुंबई येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली असून त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार या मान्यवरांच्या उपस्थितीत समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या सर्व यंत्रणा, स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने ही मोहीम यशस्वी करण्यासाठी समन्वायाने कामे करावे, अशा सूचना श्री. दराडे यांनी दिल्या. यावेळी विविध यंत्रणांचे आणि स्थानिक प्रशासनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.




# सौर कृषिपंपातून शेतकऱ्यांना वीज विक्रीचे उत्पन्न मिळवून देणार – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** कृषिपंपाच्या वीज जोडणीसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहण्यापासून ते मागणीनुसार तत्काळ कृषिपंप अशी राज्याची वाटचाल 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'मुळे झाली आहे. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या संकेतस्थळाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे व पोस्टरचे प्रकाशनही त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, उपमुख्यमंत्र्याचे सचिव श्रीकर परदेशी आणि एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सौर कृषिपंपाच्या पॅनेल्समधून निर्माण होणारी अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये पाठवून वीज कंपन्यांना विकता येईल व त्यातून शेतकऱ्याला अतिरिक्त उत्पन्न मिळविता येईल, अशी योजना लागू करण्यात येईल. त्यामुळे शेतकरी हा वीजबिल भरणाऱ्याऐवजी वीज विकून उत्पन्न मिळविणारा होईल. राज्यात २०१४ पूर्वी शेतकऱ्यांना पेड पेंडिंगची समस्या तीव्रतेने जाणवत होती. त्यानंतर शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यावर भर देण्यात आला. आता मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडीसह तत्काळ पंप मिळत आहेत. सौर कृषी पंपामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होत आहे. सौर



पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होत असल्याने तेवढा काळ वीजबिल येणार नाही. साडेसात एचपी पंपाचा विचार केला तर २५ वर्षांच्या कालावधीत त्या शेतकऱ्याचे वीजबिलाचे दहा लाख रुपये वाचणार आहेत. ही योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'कुसुम बी' योजनेच्या आधारे लागू केली असल्याने आपण प्रधानमंत्री यांचे आभार मानत असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १२ हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे करार झाले आहेत. आगामी दोन वर्षात त्यातून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती सुरू होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी शंभर टक्के सौर ऊर्जा मिळेल. शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक हरित ऊर्जा मिळण्यासोबत अनुदान आणि क्रॉस सबसिडीचे पैसे वाचतील. गेल्या अडीच वर्षातील कार्यकाळ हा राज्यातील ऊर्जा क्षेत्रासाठी टर्निंग पॉईंट ठरला आहे. या काळात तीनही वीज कंपन्यांनी मोलाची कामगिरी केली आहे, असे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी काही लाभार्थी शेतकऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. लाभार्थी शेतकरी या योजनेबद्दल समाधानी असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात गेल्या दोन वर्षात शेतकऱ्यांसाठी नवीकरणीय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येत आहे. एकेकाळी राज्यात साडेआठ लाख शेतकरी वीज जोडणीच्या प्रतीक्षेत होते, पण आता पेड पेंडिंगची संख्या नगण्य झाली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे पेड पेंडिंगची समस्या इतिहास बनेल. या योजनेत आगामी तीन वर्षात राज्यात दहा लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. योजना सुरू झाल्यानंतर अल्पावधीत दोन लाख शेतकऱ्यांची निवड झाली असून त्यापैकी ४५ हजार शेतकऱ्यांच्या शेतात मागील सहा महिन्यात सौर कृषिपंप बसविले आहेत, हा एक विक्रम आहे. महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी आभार प्रदर्शन केले.

## उच्च शिक्षक विदेशात होण्यासाठी वाढता कल..

आपल्या मुलांचे भवितव्य उज्वल असावे, अशा प्रकारची इच्छा प्रत्येक पालक बाळगत असतो. त्या दृष्टिने तो आपल्या पाल्याची वाढ योग्यतेने होईल याची लहानपणापासूनच पुरेपूर काळजी घेत असतो. शालेय शिक्षणासाठी पालक आपल्या मुलांना भारतातच संधी देत असले तरी त्यांचे पुढील पदवी व उच्चशिक्षण मात्र विदेशातच व्हावे, ही इच्छा भारतीय पालक बहुतेक करुन बाळगून असतात. नुकत्याच करण्यात आलेल्या एका सर्व्हेमध्ये ७५ टक्के श्रीमंत पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठविणे पसंत करतात, असे दिसून आले आहे. प्रसंगी आपल्या पाल्याच्या विदेशातील शिक्षणासाठी लाख ते कोटी रुपयांपर्यंत खर्च करण्याची तयारी श्रीमंत पालकांची असते, असेही अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. याकरीता आवश्यक वाटल्यास घरदार विकून किंवा कर्ज काढून मुलांना पाठवण्याची व्यवस्था भारतीय पालक करत असतात. देशात तीन चतुर्थांश संख्येचे श्रीमंत पालक विदेशात आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठविण्यावर भर देत असतात. एचएसबीसी यांनी अलीकडेच एक सर्व्हे केला होता. भारत, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर या देशांमध्ये श्रीमंत पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी पाठवितात असे त्या सर्वेत दिसून आले आहे. म्हणजेच उच्च शिक्षणासाठी वरील देश हे लोकप्रिय आहेत हेही या अहवालामध्ये समजून आले आहे. भारतातील पालकांना आजही विदेशातील विद्यापीठांचे शिक्षण हे अधिक प्रगत वाटते, हेही यावरुन दिसून येते. विदेशातील शिक्षणाविषयीचा ओढा आजही भार पालकांमध्ये कायम दिसून येतो. विदेशातील शिक्षणासाठी भारतातील पालक प्रसंगी कर्जही काढतात, असेही दिसून आले आहे. एवढ्यावरच पालक न थांबता आपल्या बचतीतील रक्कमही खर्च करण्याची तयारी पालक ठेवत असतात. यासोबत स्वत:चे घर किंवा जागा विक्री करूनसुद्धा मुलाला विदेशात पाठविण्यासाठी आवश्यक ती रक्कम उभी केली जाते. विदेशातील शिक्षणाचा दर्जा भारतीय विद्यापीठांच्या तुलनेत कैकपट्टीने अधिक असल्याने भारतीय पालक आपल्या मुलांचे उज्वल भवितव्य लक्षात घेऊन विदेशात शिकण्यासाठी पाठवत असतात. ज्या पालकांना मनात इच्छा असूनही आपल्या पाल्याला विदेशात पाठविता येत नाही, अशांना मानसिक तणावाखाली रहावे लागते, असेही एका अध्ययनात दिसून आले आहे. अमेरिकेसह, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इंग्लंड, स्पेन, हॉलंड, सिंगापूर, फ्रान्स, इटली या देशांमध्ये भारतीय पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी पाठवत असतात. अमेरिकेमध्ये मोठ्या संख्येने भारतीय शिकण्यासाठी जात असतात. तेथे खूप सारे उच्च शिक्षणाचे पर्याय उपलब्ध आहेत. अलीकडेच जर्मनीतही भारतीय मुलांचा ओढा जास्त करुन वाढतो. आहे. परवडणारे शिक्षण, संशोधन आणि प्रायोगिक प्रशिक्षणाबाबतीमध्ये जर्मनीत उत्तम शिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत. बहुसंस्कृतिक वातावरण आणि उपयुक्त विसा धोरण यामुळे ऑस्ट्रेलिया हा देशही भारतीयांसाठी आकर्षणाचा ठरला आहे. या ठिकाणी अभ्यासक्रमासोबतच नोकरी करण्याच्या संधी उपलब्ध असतात. इंग्लंड हा देशही अत्युत्तम अशा उच्चशिक्ष अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आहे. अभ्यासक्रमापश्र्चात काम करण्यासाठी या ठिकाणी संधी दिली जात असल्याने अनेक जण या देशात जाणे पसंत करतात. याच सोबत स्पेन देखील भारतीय मुलांना उत्तम उच्च शिक्षणाच्या संधी देऊ करत आला आहे. हॉलंड देशात चांगल्या रँकिंग प्राप्त विद्यापीठांची संख्या जास्त असून पदव्युत्तर उच्च शिक्षणाच्या विपुल संधी येथे उपलब्ध आहेत. शिष्यवृत्ती या ठिकाणी घेऊन शिक्षण पूर्ण करता येते. सिंगापूर, फ्रान्स आणि इटली या तीन देशांमध्ये सुद्धा भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जाण्यास पसंती दर्शवत असतात. एकंदरच या देशांमध्ये भारतीय विद्यार्थी हे उच्च शिक्षणासाठी जाऊन आपले भवितव्य उज्ज्वल बनवण्यासाठी धडपडत असतात. त्यासाठी पालकही त्याच्या इच्छांना मूर्त रुप देण्यासाठी प्रसंगी वाट्टेल तो त्याग करायची तयारी ठेवत असतात.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग : आरोपी अटक

## चान्नी ठाणे हद्दीतील घटना :आरोपीची जेलमध्ये रवानगी

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** पातुर तालुक्यातील चान्नी ठाणे हद्दीतील एका गावातील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना ११ सप्टेंबर रोजीच्या दुपारी एक वाजताच्या सुमारास उघडकीस आली, आलेगाव येथील २० वर्षीय आरोपी गौरव संजय गिऱ्हे यांनी अल्पवयीन मुलीला सांगितले की तू मला आवडते व




तू माझ्यासोबत बोलत जा,असे म्हणून तिचा वाईट उद्देशाने हात पकडून विनयभंग केला, ही घटना पीडित अल्पवयीन मुलीने तिच्या आई-वडिलांना सांगितली , पीडित मुलीच्या आई-वडिलांनी मुलीला घेऊन थेट चान्नी पोलीस गाठले आणि मुलीच्या जबाबदावरून चान्नी पोलिसांनी १२ सप्टेंबर रोजी आरोपी गौरव संजय गिऱ्हे २० याच्या विरुद्ध पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, १३ सप्टेंबर रोजीच्या पहाटे जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंग, बाळापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी गोकुळ राज यांच्या मार्गदर्शनात चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे, उपनिरीक्षक संजय कोहळे, सुधाकर करवते, ज्ञानेश्र्वर गीते, यांनी सापळा रचून आरोपीला शुक्रवार रोजीच्या पहाटे अटक केली असून,अकोला न्यायालयात हजर केले असता,न्यायालयीन कोठडीत रवानगीचे आदेश न्यायालयाने दिले आहे. पुढील तपास उपनिरीक्षक संजय कोहळे करीत आहे.

> अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी मुलीच्या जबाबावरून पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता, न्यायालयीन कोठडीत रवानगीचे आदेश न्यायालयाने दिले आहे. पुढील तपास सुरू आहे.
>
> **-रवींद्र लांडे ठाणेदार**
> **पोलिस स्टेशन चान्नी**

## उद्धव ठाकरे मुख्यमंत्री व्होण्यासाठी प्रकाश डोंगरे व आशिष राहाटे यांचे श्री चरणी साकडे



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : हिंदू हृदय सम्राज बाळासाहेब ठाकरे यांचे पूत्र व महाराष्ट्राची बुलंद तोफ माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या रुपाने महाराष्ट्राला एक चांगले कुटुंब प्रमुख मिळावे, येत्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा मुख्यमंत्री व्हावे, यासाठी गुरुवार दि.१२ सप्टेंबर २०२४ रोजी प्रकाश डोंगरे व आशिष रहाटे यांनी देऊळगाव माळी येथे येऊन क्रांती गणेश मंडळ या ठिकाणी श्री गणरायाची आरती केली व श्रीचरणी साकडे घातले. उध्द्व बाळासाहेब ठाकरे शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोरोना काळातही मुख्यमंत्री म्हणून अत्यंत उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यामुळे त्यांचे नाव उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून जाहिर झालेल्या आले आहे. स्वच्छ प्रतिमेचे व्यक्तीमत्व, सर्वांना सोबत घेऊन् चालण्यारे व्यक्तीमत्व आणि महाराष्ट्राची बुलंद तोफ असणारे उद्धव ठाकरे




यांच्या रुपाने महाराष्ट्राला एक उत्कृष्ट मुख्यमंत्री लाभले होते.आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये सुद्धा उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री होण्याची संधी मिळावी, यासाठी यासाठी गुरुवार दि.१२ सप्टेंबर २०२४ रोजी प्रकाश डोंगरे व आशिष रहाटे यांनी देऊळगाव माळी येथे येऊन क्रांती गणेश मंडळ या ठिकाणी



श्री गणरायाची आरती केली व श्रीचरणी साकडे घातले. यावेळी प्रकाश भाऊ डोंगरे व आशिष भाऊ राहते यांचा मंडळतर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी क्रांती गणेश मंडळ, मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य तसेच गावातील महिला मंडळी व भक्तमंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



बालगोपाल पाटील गणेश मंडळ डोणगांव



जय श्री महाकाल मित्र मंडळ इंदिरा नगर.डोणगाव



अष्टविनायक गणेश मंडळ डोणगाव



न्यू जिजामाता गणेश मित्र मंडळ डोणगाव

## विमुक्त जातीतील राजपूत यांची घुसखोरी थांबवा,अन्यथा तुमचा सुपडासाफ करु- गोरसेनेचे शासनाला इशारा

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी** : नुकत्याच एमबीबीएस प्रवेशप्रक्रीयेला सुरुवात झाली असून महाराष्ट्रातील विमुक्त जाती अ प्रवर्गातराजपूत ने प्रचंड घुसखोरी केली असून विमुक्त जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या तब्बल तिनशे पेक्षा अधिक जागा बोगस राजपूत नी हडप केल्या आहेत यासाठी गोरबंजारा समाजातील अग्रेसर असलेल्या गोरसेना या सामाजिक संघटनेच्या वतीने आज संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत शासनाला निवेदन देऊन ही घुसखोरी थांबविण्याची विनंती केली आहे अन्यथा येणार्या निवडणूकीत विद्यमान सरकारचा सुपडासाफ करण्याचा गर्भीत इशारा गोरसेनेने दिला आहे.

सविस्तर बातमीनुसार,विमुक्त जाती




अ मध्ये राजपूत भामटा या अत्यल्प लोकसंख्या असलेल्या जातीचा सामावेश असून नाम साधर्म्याचा फायदा घेत सवर्ण राजपूत, मिना,छप्परबंद या खुल्या प्रवर्गातील जनसमुदाय यांनी खुलेआम घुसखोरी करीत अभियांत्रिकी, वैद्यकीय, सह शासकीय नोकरभरतीत लाभ घेत आहे.राजपूत जातीतील लोक भामटा शब्द लावून भामटेगिरी करत असल्याने मुळ विमुक्त जाती अ प्रवर्गातील १४ तत्सम जाती आरक्षणाचे अतोनात नुकसान होत आहे म्हणून गोरसेना या संघटनेतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात २०१९ पासून ठिकठिकाणी आंदोलने होत आहे. यासंदर्भात न्याय हक्क व अधिकारांसाठी गोरसेनेने राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात निवेदने दिलीत,नंतर जिल्हा स्तरावर रास्ता रोको करण्यात आले होते. मोर्चा आंदोलने गोरसेनेनी केले.तेव्हा विधीमंडळात विशेष तपासणी आयोग एस.आय.टी. नेमण्याची घोषणा दलीत बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केली.मात्र राजकीय दबावाखाली येत त्यांनी दुसर्याच दिवशी माझ्या कडून चुकीची घोषणा झाल्याचे सांगत एस.आय.टी.लागू करणार नसल्याचे सांगितले. तेव्हा गोरसेनेच्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनावर नागपुरात ०८ डिसेंबर रोजी २५ -३० हजार लोकांच्या जनसमुदायाला घेऊन जन आक्रोश महामोर्चा काढण्यात आले मात्र या मोर्चाचे साधे निवेदन घेण्यासाठी सुद्धा राज्य सरकारच्या एकही मंत्र्याने औचित्य दाखविले नाही. मंत्री अतुल सावे विधीमंडळातून पळ काढला अन् मोर्चे करीच्या नेतृत्वाला सामोरे गेले नाही. साधे निवेदन न घेतल्याने समस्त गोरबंजारा समाजाचा जाणिवपूर्वक अपमान राज्यसरकारने केलेला आहे. कालपरवा दिनकर राठोड या गोरबंजारा युवकांने पुसद येथे १४ दिवस आमरण उपोषण केले मात्र त्यांची राज्यसरकारने किंचितही दखल घेतली नाही की विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात साधी चर्चा सुद्धा केली नाही त्यामुळे गोरबंजारा समाज प्रचंड संतापलेला असून यावेळी बंजारा समाजाच्या मतावर निवडून गेलेल्या आमदारांनी समाजाचा हा जिवंत प्रश्र्नाकडे जाणिवपूर्वक कानाडोळा केला. राजपूत घुसखोरी च्या प्रश्र्नाबाबत साधे निवेदन न केलेल्या राज्यसरकारला धडा शिकवण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी कंबर कसली असून या वेळी ६२ विधानसभा आमदारांना घरचा रस्ता दाखवण्याचा गर्भित इशारा गोरसेनेने दिले आहे. या अगोदर संपूर्ण राज्यात १८जिल्हायात जोडे मारो आंदोलन केले होते . त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात गोरसेनेने विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले होते त्यामध्ये तुळजापूर,जालना, मंठा,पुसद,दिग्रस, दारव्हा, अकोला,वाशीम, हिंगोली,नांदेड,बीड,बुलढाणा आदी ठिकाणचा सामावेश होता .बोगस राजपूत यांच्या घुसखोरीविरोधात गोरसेनेने रणसिंग फुंकलेले असून गोरसेनेचे आंदोलन हे जन आंदोलन होत आहे.तांडा,वाड्यावरुन या आंदोलनाला जनतेचे मोठे पाठबळ लाभत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

# राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपचे निदर्शने

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी : काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी अमेरिकेच्या दौऱ्यादरम्यान एका मुलाखतीत आरक्षणासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी राज्यात भाजपाच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करीत आंदोलन करण्यात आले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षणासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेर्धात धुळे शहरातील अग्रवाल विश्राम भवना समोर भाजपच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी. काँग्रेस हटाव... देश बचाव.. महाविकास आघाडी हटाव.. महाराष्ट्र बचाव.. राहूल गांधी मुर्दाबात अशा घोषणा देण्यात आल्या.तसेच संपूर्ण राज्यात भाजपच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले.भाजपने आक्रमक पवित्रा घेत राहुल गांधी यांच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन पुकराले आहे.**




काँग्रेसच्या आणि राहुल गांधीच्या पोटात जे होते ते शेवटी ओठावरच आले. त्यामुळे आरक्षण विरोधी कोण आहे. हे जनतेला कळले आहे.

**-सुनील बैसाने,**
**भाजपा माजी नगरसेवक.**

सोलापुरात भाजपचे राहुल गांधी विरोधात निदर्षने सोलापुरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात राहुल गांधी यांनी आरक्षणाबाबतीत केलेल्या वक्ताव्याचा निषेध आंदोलन करण्यात आले. माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख आणि माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

कल्याणात राहुल गांधी यांचा काळ्या फिती बांधून निषेध कल्याण. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत एका कार्यक्रमात आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्याचा निषेध नोंदवण्यासाठी भाजपने कल्याण पूर्वेकडील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाहेर आज दि.१३ सप्टेंबर रोजी भाजप विधानसभा प्रमुख सुलभा गायकवाड, जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, अनुसूचित मोर्चा प्रदेश सरचिटणीस शशिकांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली भाजप कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी काळ्या फिती बांधून, हातात निषेधाचे बॅनर घेत निषेध आंदोलन केले.

अमरावतीत जोडे मारो आंदोलन अमरावती. काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणासंदर्भात केलेल्या विधानानंतर भारतीय जनता पक्ष चांगलाच आक्रमक झाला आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर अमरावतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर राहुल गांधी यांच्या विरोधात आंदोलन करत घोषणाबाजी करण्यात आली. तर राहुल गांधी यांच्या पोस्टरला जोडे मारत त्यांचे पोस्टर जाळण्यात आले.

**-सिद्धार्थ वानखडे,**
**अनुसूचित जाती मोर्चा राज्य उपाध्यक्ष.**

## नाशिक येथे भाजप नेत्यांच्या वक्तव्याचा निषेध

नाशिक. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना जीवे ठार मारण्याची धमकी भाजपचे नेते तरविंदर सिंग मारवाह यांनी दिली. या धमकीच्या निषेधार्थ काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेत तसेच भाजप नेते तरविंदर सिंग मारवाह यांना अटक करा आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी केली आहे. नाशिकमध्ये राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करत भाजपचा निषेध आंदोलन काँग्रेस नाशिक अध्यक्ष आकाश छाजेड , जिल्हा प्रमुख राजेंद्र बागल यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यावेळी भाजपचे विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली.

नाशिकमध्ये राहुल गांधी विरोधात भाजप चांगलीच आक्रमक नाशिक. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षणाच्या संदर्भात केलेल्या विधानावरून भाजप चांगलीच आक्रमक झाली. नाशिकच्या शालिमार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी आमदार देवयानी फरांदे या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. राहुल गांधींचा प्रतिकात्मक पुतळा जाळत भाजपने जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी काँग्रेसचा छुपा चेहरा समोर आला असून याच काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर कसा अन्याय केला. याबाबत फरांदे यांनी गंभीर आरोप केले.

राहुल गांधीचे वक्तव्य ही काँग्रेसची भविष्यातील रणरीती नांदेड. देशाच्या आरक्षणाविषयी राहुल गांधीने परदेशात जाऊन जे वक्तव्य केले आहे.ही त्यांची भूमिका म्हणजे भविष्यातील रणरीती राहणार आहे.आरक्षणाचा मुद्दा हा देशात उचलायचा असतो. देशातील मागासवर्गीयांची मते घ्यायची आणि काहीही वक्तव्ये करायची,असे त्यांचे दोन मुखवटे समोर आलेले आहेत. देशात एक बोलायचे आणि परदेशात दुसरे बोलायचे, लोकांच्या भावनेशी खेळायचं आणि मतांसाठी राजकारण करायचे, त्यांच्या या वक्तव्याचा आम्ही निषेध करतो

**-अशोक चव्हाण, खासदार, नांदेड.**

जालन्यात राहुल गांधीच्या पोष्टरला जोडेमारो आंदोलन जालना. काँगेस नेते राहुल गांधी यांनी अमेरीका येथे केलेल्या आरक्षणविरोधी वक्तव्याविरोधात जालना येथे भाजपने निषेध नोंदवित आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान भाजप कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या बॅनर वरील फोटोला जोडे मारून त्यांचा फोटो जाळला. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान राहुल गांधी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. दरम्यान,काँग्रेस पक्ष मतांच्या राजकारणासाठी आरक्षणाच्या नावाखाली राजकारण करत असल्याचा आरोप भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर दानवे यांनी केलाय.

## काँग्रेसकडून जनतेची दिशाभूल करण्याचे काम : डॉ. हिना गावित

नंदुरबार.अमेरिकेतील एका मुलाखतीत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षण रद्द करून कायमचे काढून टाकू अशी भाषा केली. याच्या निषेधार्थ आज भारतीय जनता पार्टी नंदुरबार जिल्ह्याच्या वतीने राहुल गांधी यांच्या विरोधात घोषणा देण्यात येऊन त्याच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला. यावेळी भाजपा च्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ हीना गावित, जि.प.अध्यक्षा डॉ.सुप्रिया गावित, आ.राजेश पाडवी, भाजपचे महामंत्री विजय चौधरी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भाजपाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. हिना गावित यांनी सांगितले की, याच काँग्रेस पक्षाने लोकसभा निवडणुकीत खोटा प्रचार करून जनतेची दिशाभूल केली होती. जर भाजप ४०० पार गेला तर संविधान नष्ट करून आरक्षण रद्द करेल आणि आता तेच काँग्रेसचे खासदार एसटी व एससीचे आरक्षण रद्द करण्याची भाषा करून राहिले. यावरून काँग्रेसची भूमिका काय आहे हे स्पष्ट होताना दिसत आहे. काँग्रेस जनतेची दिशाभूल करून करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील मागील १० वर्षात व आताच्या तिसऱ्या काळामध्ये देशाच्या सर्वांगीण विकास होताना दिसत आहे. अनेक विकास कामे होताना दिसत आहेत. परंतु काँग्रेस अपप्रचार करून जनतेची दिशाभूल करण्याचे काम करत असल्याचे स्पष्ट झाले आहे हे यावरून दिसते म्हणून आज राहुल गांधीचा जाहीर निषेध करत असल्याचे डॉ हिना गावित यांनी सांगितले.

## राहूल गांधी : वर्ध्यात महात्मा गांधी पुतळ्याजवळ निषेध आंदोलन

वर्धा. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षण संदर्भात केलेल्या वक्त्यव्याच्या विरोधात भारतीय जनता पार्टीच्या वतीने येथील महात्मा गांधी पुतळ्या जवळ निषेध आंदोलन करण्यात आले. राहुल गांधी यांनी देशाची माफी मागावी अशी मागणी या आंदोलनातून करण्यात आली आहे. यावेळी माजी भाजप जिल्हाध्यक्ष सुनिल गफाट, खासदार रामदास तडस, माजी खासदार सुरेश वाघमारे,आमदार समीर कुणावार,राजेश बकानेसह मोठ्या संखेने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### संक्षिप्त...

## नारायणराव नागरे महाविद्यालयात प्रधानमंत्री जनधन योजना जनजागृती अभियानाचे आयोजन




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**दुसरबीड :** स्थानिक दुसर बीड १३ येथे नारायणराव नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रधानमंत्री जनधन योजना जनजागृती अभियान सुरू करण्यात आले या जनजागृती अभियानाच्या माध्यमातून देशातील नागरिकांनी जास्तीत जास्त बँकेमध्ये खाते ओपन करून ऑनलाइन पद्धतीने व्यवहार करण्याच्या हेतूने प्रभात फेरी काढण्यात आली या पाठीमागील महत्वाचा उद्देश म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच परिसरातील खेड्यापाड्यांमध्ये महिलांनी व पुरुषांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याच्या हेतूने आपले स्वतःचे खाते बँकेमध्ये असले पाहिजे याविषयी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विजय नागरे यांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजेत यासाठी प्रधानमंत्री जनधन योजना जनजागृती प्रभात फेरी काढण्यात आली यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. दीपक देशमाने डॉ. गणेश घुगे प्रा. मिलिंद गवई प्रा. नयना मॅडम प्रा.शेख इनुस प्रा. सत्यम श्रीवास्तव प्रा. तारे प्रा. सर्जेराव वाघ व गावातील नागरिक विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## अरविंदजीना बेल मिळाली, त्याबद्दल आम्ही आनंदी आहोत. सुप्रिया सुळे

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** सत्य परेशान हो सकता हैं, लेकिन पराजित नहीं हो सकता, सत्याचाच नेहमी विजय होतो. खूप अन्याय केजरीवाल यांच्या कुटुंबाने सहन केला आहे.विरोधी पक्षाच्या कुटुंबाने खूप त्रास दिला. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना बेल मिळाली, त्याबद्दल आम्ही खूप खूप आनंदी आहोत, समाधानी आहो. अशी प्रतिक्रिया खा. सुप्रिया सुळे यांनी दिली. तसेच मी नेहमीच मराठा, धनगर, लिंगायत या समाजाच्या आरक्षणासाठी संसदेत वारंवार बोलले आहे. एखादा वडील मुलीला मारून नदीत फेकून देण्याची भाषा बापाने करणे ही एक प्रकारची भ्रूणहत्याच आहे.हे किती दुर्दैवी आहे. म्हणून एका बहिणीला वाचवण्यासाठी जाणे हे माझे कर्तव्यच आहे.सुसंकृत महाराष्ट्रात कोणत्या वडिलांना ही भाषा शोभते.

## शेतकऱ्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आक्रमक; शासनाने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** आधीच अस्मानी व सुलतानी संकटात संपूर्ण शेतकरी सापडला असून गडगडलेले शेतमालाचे बाजार भाव वाढलेला प्रचंड उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अगदी मेटाकोटीस आलेला आहे अशातच शासनाकडून काही तुटपुंज्या स्वरूपाच्या मदती दिल्या जात आहेत परंतु त्या मदती मिळवण्यासाठी प्रचंड जाचक अटी घालून दिल्या जात आहेत यामध्ये शेतकऱ्याची प्रचंड घालमेल होत आहे शेतातील कामे करावी की मदतीसाठी घातलेल्या जाचक अटी पूर्ण कराव्या या विवंचनेत संपूर्ण शेतकरी सापडलेला आहे कृषी विभागाकडून मिळणारी मदत त्यामधील सामायिक क्षेत्रात नावे असलेल्या शेतकऱ्यांना नव्यानेच प्रतिज्ञा लेख मागवला जात आहे त्या सर्व सामायिक खातेदारांना प्रत्यक्ष तहसीलवर हजर राहण्यासाठी वेळोवेळी चकरा माराव्या लागत आहेत त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्र सुद्धा मिळविताना विद्यार्थी व पालकांचे प्रचंड हाल होत आहेत ही बाब अत्यंत गंभीर असून सदर बाबीची दखल घेऊन रिसोड तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी यांनी चक्क तहसील कार्यालयात कृषी अधिकारी व तहसीलदार यांच्याशी सामूहिक चर्चा करून निवेदन दिले चर्चेमध्ये विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे मिळविताना तात्काळ ठेवू नये अशी भूमिका शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख यांनी मांडली व शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता सहकार्याची भूमिका ठेवावी अशी सूचना रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्र्वनाथ सानप यांनी मांडली तसेच इतरही अडचणी सोडवण्यासाठी तहसील प्रशासन व कृषी विभाग यांनी दिरंगाई करू नये अन्यथा शिवसेनेला तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल अशा आशयाचे निवेदन सुद्धा यावेळी देण्यात आले यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख नारायण आरु तालुका समन्वयक घनश्याम मापारी युवासेना उपजिल्हाप्रमुख गणेश देशमुख युवासेना तालुकाप्रमुख गजानन सानप तालुकाप्रमुख समाधान काठोळे दीपक मापारी किसन कळासरे दुर्गादास मोरे शिवसेनेचे पदाधिकाऱ्यांसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.



श्री संत सावता माळी गणेश मंडळ डोणगाव

## उपसभापतीचा पुढाकार: विद्यार्थ्यांना मिळाला प्रवेश

### आलेगाव येथील पालकांना दिलासा

दैनिक आपला विदर्भ

**पातूर/प्रतिनिधी :** पातुर पंचायत समिती अंतर्गत आलेगाव येथील शहाबाबू शाळेत उपसभापतीच्या प्रयत्नामुळे नुकतेच नववीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. आलेगाव येथील शहाबाबू शाळेत नववीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्याबाबतचे शिक्षण विभागाचे पत्र असतानाही मुख्याध्यापकाने प्रवेशाला नकार दिल्यामुळे संतप्त झालेल्या पालकांनी पातुर पंचायत समितीचे उपसभापती इमरान खान मुमताज खान व सरपंच यांच्याकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीवर उपसभापती इमरान खान यांनी चौकशीसाठी शाळेला भेट दिली होती.परंतु उपसभापतीने मुख्याध्यापकाला मारहाण करून शाळेतील रेकॉर्डची फेकफाक केल्याचा आरोप मुख्याध्यापकांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीतून केला होता. त्यावर उपसभापती व त्यांचा सहकारी असे दोघेविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. मात्र उपसभापती विरुद्ध लावलेले सर्व आरोप खोटे असल्याचा




आरोप गावकरी व वंचितचे कार्यकर्त्यांनी घेऊन गुन्हा मागे घेण्यासाठी पोलिसात निवेदन दिले होते. या वादविवादात

विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्यास नकार देत असल्याबाबतची प्राप्त झालेल्या तक्रारीवर शाळेत चौकशीसाठी गेलो असता, माझ्या विरोधात पोलिसात खोटी तक्रार दिली,परंतु मी सर्व प्रकार वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्याशी चर्चा केली आणि बाळासाहेब आंबेडकर यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्यात आले आहे.


**-इमरान खान मुमताज खान**
**उपसभापती प.स.पातुर**

विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडले होते. उपसभापती यांनी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे हा विषय मांडला, ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी संबंधित शिक्षण विभागाशी चर्चा करून विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्यास भाग पाडले, त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा मिळाला आहे.

## गणपती दर्शन



सप्तश्रृंगी गणेश मंडळ डोणगांव



हे लंबोदर गणेश मित्र मंडळ डोणगाव



जय बजरंग मित्र मंडळ डोणगांव



शिवास्त्र प्रतिष्ठान गणेश मंडळ शिवास्त्र प्रतिष्ठान गणेश मंडळ डोणगाव डोणगाव

# लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे प्रवाशी निवाऱ्याची दुरावस्था

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी** :ग्रामीण भागात एसटी बसचा प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांना ऊन-पावसापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक गावात आणि गाव फाट्यावर शासनाच्या वतीने प्रवासी निवारा बांधण्यात आले आहेत.

मात्र आता हे प्रवासी निवारी अदृश्य झाल्याचे चित्र आहे. संबंधीत प्रशासनासह लोकप्रतिनिधी सुद्धा अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. मेहकर ते डोणगाव रोडवरील खंडाळा, हिवरा साबळे येथील प्रवासी निवारा नसल्याने येथील प्रवाशांना उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. छत्रपती संभाजी नगर ते नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील ही गावे येत असल्याने या ठिकाणाहून छत्रपती संभाजीनगर, नागपूर या या मार्गावरून जाण्यासाठी प्रवाशांची चोवीस तास वर्दळ असते. गोरगरीब प्रवाशी हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसने करतात. त्यामुळे बसची वाट पाहत या प्रवाशांना पावसाळ्यात पावसामध्ये तर, उन्हाळ्यात उन्हामध्ये उभे राहून बसची वाट पाहत उभे राहावे लागते. त्या नादुरुस्त प्रवासी निवारे दुरुस्त करण्याची मागणी प्रवाशी वर्गाकडून केली जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपूर्वी या महामार्गाचे दुपदरीकरण झाले आहे.त्यावेळी प्रवाशांच्या सोयीसाठी उभारलेली ही प्रवाशी निवारे अदृश्य झाले आहेत. त्यांनतर नव्याने प्रवाशी निवारे उभारण्यात न आल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. सदर गंभीर प्रकरणाकडे स्थानिक आमदार यांनी लक्ष देऊन प्रवासी निवारे तात्काळ बांधण्याचे आदेश संबंधीत विभागाला द्यावे,अशी मागणी प्रवाशी वर्गाकडून होत आहे.

## राळेगाव शहरात युवकावर चाकुहल्ला युवक गंभीर जखमी

दैनिक आपला विदर्भ

राळेगाव येथे दिनांक १२/९/२४ रोजी दुपारी १.३० वाजताच्या दरम्यान भरदुपारी राळेगाव शहरातील महालक्ष्मी मोबाईल शॉपी जवळ चाकुहल्ला करुन केले गंभीर जखमी. सदर घटनेतील आरोपी विशाल मारोती खळसकार वय २२ वर्षे रा.झाडगाव यांनी जखमी योगेश उर्फ आशिष उत्तमराव लढी वय २९ वर्षे रा.झरगड सदर घटनेतील आरोपीच्या बहीणीचे जखमी योगेश उर्फ आशिष यांच्याशी पाच वर्षांपूर्वी प्रेमविवाह झाला होता.तेव्हापासुन जखमी ही त्यांच्या बहीणीला खुप त्रास देत असल्याने सदर घटनेतील आरोपी याने राळेगाव शहरातील महालक्ष्मी मोबाईल शॉपी जवळ जखमींच्या पोटावर,मानेवर, चाकुने जिवेमारण्याच्या हेतुने वार केले .सदर घटनेची माहिती राळेगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार सिताराम मेहत्रे यांना मिळतात तातडीने घटनास्थळी पोहचुन जखमीला तातडीने त्याचे नातेवाईक यांनी ग्रामीण रुग्णालय राळेगाव येथे उपचारासाठी दाखल केले व.पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात यवतमाळ येथे पाठविण्यात आले असून उपचार सुरू आहे . जखमीचा भाऊ स्वप्नील उत्तम लढी यांनी राळेगाव पोलिस स्टेशनला रिपोर्ट दिला असता त्यावरुन अ.प.क्र.३७६/२४ कलम १०९ भा.न्याय.सहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे . घटनेतील आरोपी विशाल मारोती खळसकार याला राळेगाव पोलिसांनी अवघ्या आठ तासात अटक केली असुन घटनेचा पुढील तपास . रामेश्र्वर वेंजणे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सिताराम मेहत्रे पोलिस निरीक्षक राळेगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विशाल बोरकर हे करीत आहे.

**राळेगाव पोलिसांनी अवघ्या आठ तासात आरोपीला केले अटक**

## गणपती विसर्जन स्थळाची अधिकाऱ्यांनी केली पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : गणेश विसर्जन स्थळी श्री गणेश भक्तांना कोणताही त्रास होऊ नये, गणपती विसर्जन शांततेत व मंगलमय वातावरणात व्हावे, यासाठी पोलिस प्रशासनाच्या अधिकार्यांनी गणपती विसर्जन स्थळाची नुकतीच पाहणी केली. लाडक्या गणरायाला निरोप देत असताना गणेश मूर्तीची विटंबना होऊ नये किंवा विसर्जनासाठी बुलडाणेकरांची गैरसोय होऊ नये, यासाठी सैलानी रोडवरील सागवन पुल, चिखली रोडवरील येळगाव पूल या ठिकाणी मोठे गणपती विसर्जन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच बुलडाणा शहरातील छोटे घरगुती गणपती विसर्जनासाठी टीबी रुग्णालयाजवळील सरकारी तलाव, राणी बाग या ठिकाणी करण्यासाठी छोटे कृत्रिम तलाव व निर्माल्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी या तलाव परिसरात योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ठाणेदार नरेंद्र ठाकरे, नगरपालिका मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी विसर्जन घाटाची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी गुलाल बंदीचा आदेश काढला आहे. त्या अनुषंगाने गणपती मंडळांनी गुलालाचा आणि डीजेचा वापर करू नये, अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलिस विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

गणपती विसर्जन करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने संपूर्ण व्यवस्था केली आहे. नागरिकांनी सहकार्य करावे, शांततेत गणेश विसर्जन करावे,

**-गणेश पांडे,**
**मुख्याधिकारी नगर परिषद, बुलढाणा.**

गणेश भक्तांनी नियमांचे पालन करून शांततेत विसर्जन करावे, सर्वधर्मसमभावाने लाडक्या बाप्पाला निरोप द्यावा. गणेश विसर्जन स्थळी व मिरवणुकीवर पोलिस प्रशासन लक्ष ठेवून आहे.

**-नरेंद्र ठाकरे,**
**पोलिस निरीक्षक,**
**बुलढाणा शहर.**

## दलित, आदिवासी, ओबीसी समाजाने राहुल गांधीच्या शब्दाचा निषेध करावा - आदिवासी विकास मंत्री डॉ विजयकुमार गावित

दैनिक आपला विदर्भ



**नंदूरबार/प्रतिनिधी** : अमेरिकेत एका मुलाखती दरम्यान राहुल गांधी यांनी आरक्षण विरोधी गोष्टी केली आहे.त्यांनी सांगितले की आमची सत्ता आल्यावर वेळ पडली तर आदिवासी दलित व ओबीसीचे आरक्षण रद्द करू या वक्तव्याचा राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ विजयकुमार गावीत यांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे. काँग्रेस पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या वेळेस असाच भाजपा विरोधात आरक्षण रद्द करण्याच्या अपप्रचार केला होता .भाजप ४०० पार गेला तर आरक्षण रद्द होईल असे बोलून त्यांनी जनतेची दिशाभूल केली . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळोवेळी सांगितले की आम्ही असे होऊ देणार नाही जोपर्यंत आम्ही आहे तोपर्यंत आरक्षणला धक्का देणार नाही परंतु काँग्रेसचे दुटप्पी धोरण आता जनते समोर आले आहे. त्यांनी कशाप्रकारे अपप्रचार करून नागरिकांची दिशाभूल केली आहे त्यामुळे राहुल गांधी यांच्या आम्ही तीव्र शब्दात निषेध करत असून त्यांच्या सोबत असलेल्या इतर पक्षांच्या नेत्यांच्या देखील आम्ही निषेध करत आहोत. या खोट्या अपप्रचार करून , खोटे बोलून राहुल गांधी यांनी जनतेची मत घेतली त्यांना आता जनतेने जाब विचारला पाहिजे .दलित, आदिवासी, ओबीसी समाजाने सर्व स्तरावर राहुल गांधी यांचा जाहीर निषेध करावा असे आदिवासी विकास मंत्री नामदार डॉ.विजयकुमार गावित यांनी आज बोलताना सांगितले.

## महायुतीमध्ये महाभारत सुरू आहे : नाना पटोले



**गोंदिया/प्रतिनिधी** : भाजपचा विदर्भात पूर्ण सुपडा साफ होणार आहे. त्याच्यापेक्षाही कमी जागा महायुतीला मिळणार आहेत. लोकांना आता कळले आहे की भाजप महाराष्ट्र विरोधी आहे. महायुतीमध्ये महाभारत सुरू आहे. असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. ते गोंदिया येथे बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले की, आमच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचे सर्वांगीण विकासाच्या प्रश्र्न आहेत. काँग्रेसच्या काळात आम्ही जो महाराष्ट्र तयार केला होता. तो महाराष्ट्र विकण्याचे काम भाजप सरकारने केला आहे. प्रत्येक भागातील प्रश्र्न वेगवेगळे आहेत आणि म्हणून आम्ही विकासाची गॅरंटी देत आहो. तर निवडणुका जाहीर व्हायच्या आहेत. असताना महायुतीमध्ये महाभारत सुरू आहे आणि ते पुढे आणखी सुरू रहाणार आहे. आज भाजपने जे बंद पुकारला आहे त्याच्या काँग्रेस निषेध करते.

## समृद्धी महामार्गावर तीन वाहनाचा विचित्र अपघात अपघातात दोन गंभीर जखमी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : समृद्धी महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच आहे अपघातामध्ये वाढ होत असल्याचे एकत्रित चित्र आहे दिनांक १३/ ९ /२०२४ रोजी सकाळी ३.१५ वा दरम्यान चायनैज क्रमांक २९१ नागपूर कॅरीडोवर ट्रक क्रमांक OD -15-H-3672 संभाजीनगर कडून नागपूरकडे जात असताना पाठीमागून येणाऱ्या पिकप क्रमांक GJ-10-TY-1542 चे चालक अनिल निसाल याला झोपेची डुलकी लागल्याने समोरील वाहनाचा अंदाज न आल्याने समोर जाणाऱ्या ट्रकला पाठीमागून धडक दिली. व सदर पिकप समोरील ट्रक मध्ये जाऊन फसले त्यामुळे समोरील ट्रक चालकाने ट्रक थांबवून सुरक्षित इमर्जन्सी लेन वर ट्रक घेत असताना पुन्हा पाठीमागून दुसरे पिकअप क्रमांक MH-17 CV-2685 चे चालक अभिषेक दुधले रा नगर यांनी चुकीचे ओव्हरटेक करण्याच्या नादामध्ये सदर ट्रकला पाठीमागून धडक दिली यामध्ये दोन्हीही पिकप चालक गंभीर जखमी झाल्याने त्यांना तात्काळ QRV टीम मेहकर चे जवान रुस्तुम कुटे, जाधव, देशमुख व आरगडे यांच्या मदतीने अथक प्रयत्नाने वाहना मधून बाहेर काढले १०८ ॲम्बुलन्स चे डॉक्टर वैभव बोराडे व चालक दिगंबर शिंदे यांनी मेहकर ग्रामीण रुग्णालय येथे उपचार कामी घेऊन गेले. व महामार्ग पोलीस चे पोलीस उपनिरीक्षक गजानन उज्ञैनकर, पोकॉ निवृत्ती सानप ,अरुण भुतेकर, योगेश शेळके, संदीप किरके यांनी तिन्ही अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साह्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

